## शिवानंद टाकसाळे, अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे समोरील कामकाज
## (विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद)

Office Of The Divisional Commissioner * Aurangabad. *

प्रकरण क्र.:- आरओआर/अपील/५४६/२०१६

दाखल दिनांक २८-१२-२०१६

निर्णय दिनांक १५-०१-२०१८

श्रीमती मिना माधवराव पाटील,
रा.प्लॉट नं.२, ग.नं.५८, कमलनयन बजाज हॉस्पीटल जवळ -- पुनरिक्षण अर्जदार
औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१) श्री.अरुणकुमार नरहरी सातारकर,
रा.बी-८६, नविन शांतीनिकेतन कॉल्नी, औरंगाबाद

२) श्री.शशिकांत नरहरीराव सातारकर,
रा.भानुदासनगर, औरंगाबाद

३) श्री.अनिलकुमार नरहरीराव सातारकर,
रा.हडको, नांदेड, ता.जि.नांदेड

४) श्री.मधुकरराव तात्याबा काळे,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

५) श्री.यशवंत पंडीतराव पुराणीक,
रा.लक्ष्मी, रामकृष्णनगर, वसमत रोड, परभणी

६) श्रीमती भिमाबाई माधवराव,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

७) श्री.सुधाकर पंडीतराव सातारकर,
रा.नं.६, परिमल, एन-४, सिडको,औरंगाबाद

८) श्री.राधकृष्ण पंडीतराव सातारकर,
रा.बी-३०, नरसिंहकृपा, जवाहर कॉलनी, औरंगाबाद

९) श्री.बाळकृष्ण पंडतराव सातारकर,
रा.नं.२६, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद कॉलनी, पिरबाजार,
उस्मानपूरा, औरंगाबाद

१०) श्री.संदिपान पंडीतराव बोराडे,
रा.नं.५८, प्लॉट नं.१, बीड बायपास, सातारा, औरंगाबाद

११) श्री.नागेश जगदिशराव देशपांडे,
रा.डी-४४, नविन शांतीनिकेतन कॉलनी, औरंगाबाद

१२) श्री.अच्युतराव श्रीनिवास सातारकर,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

१३) श्री.आबासाहेब तात्याराव काळे,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

१४) श्री.मधुकर तात्याराव काळे,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

१५) श्री.शरद दत्तलाल परीहार,
रा.मिलन मित्तल भंडार, मच्छलीखडक, औरंगाबाद

१६) श्री.दिनेश दत्तलाल परिहार,
रा.मिलन मित्तल भंडार, मच्छलीखडक, औरंगाबाद

१७) श्रीमती माधुरी प्रमोदराव लोणीकर,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

**शिवानंद टाकसाळे, अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे समोरील कामकाजे**
**(विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद)**

Office Of The Divisional Commissioner * Aurangabad *

प्रकरण क्र.:- आरओआर/अपील/५४६/२०१६

दाखल दिनांक २८-१२-२०१६

निर्णय दिनांक १५-०१-२०१८

श्रीमती मिना माधवराव पाटील,
रा.प्लॉट नं.२, ग.नं.५८, कमलनयन बजाज हॉस्पीटल जवळ -- पुनरिक्षण अर्जदार
औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१) श्री.अरुणकुमार नरहरी सातारकर,
रा.बी-८६, नविन शांतीनिकेतन कॉल्नी, औरंगाबाद

२) श्री.शशिकांत नरहरीराव सातारकर,
रा.भानुदासनगर, औरंगाबाद

३) श्री.अनिलकुमार नरहरीराव सातारकर,
रा.हडको, नांदेड, ता.जि.नांदेड

४) श्री.मधुकरराव तात्याबा काळे,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

५) श्री.यशवंत पंडीतराव पुराणीक,
रा.लक्ष्मी, रामकृष्णनगर, वसमत रोड, परभणी

६) श्रीमती भिमाबाई माधवराव,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

७) श्री.सुधाकर पंडीतराव सातारकर,
रा.नं.६, परिमल, एन-४, सिडको,औरंगाबाद

८) श्री.राधकृष्ण पंडीतराव सातारकर,
रा.बी-३०, नरसिंहकृपा, जवाहर कॉलनी, औरंगाबाद

९) श्री.बाळकृष्ण पंडतराव सातारकर,
रा.नं.२६, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद कॉलनी, पिरबाजार,
उस्मानपूरा, औरंगाबाद

१०) श्री.संदिपान पंडीतराव बोराडे,
रा.नं.५८, प्लॉट नं.१, बीड बायपास, सातारा, औरंगाबाद

११) श्री.नागेश जगदिशराव देशपांडे,
रा.डी-४४, नविन शांतीनिकेतन कॉलनी, औरंगाबाद

१२) श्री.अच्युतराव श्रीनिवास सातारकर,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

१३) श्री.आबासाहेब तात्याराव काळे,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

१४) श्री.मधुकर तात्याराव काळे,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

१५) श्री.शरद दत्तलाल परीहार,
रा.मिलन मित्तल भंडार, मच्छलीखडक, औरंगाबाद

१६) श्री.दिनेश दत्तलाल परिहार,
रा.मिलन मित्तल भंडार, मच्छलीखडक, औरंगाबाद

१७) श्रीमती माधुरी प्रमोदराव लोणीकर,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

१८) श्री.अनंतराव राधकृष्ण सातारकर,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

१९) श्रीमती सुचिता बाळकृष्ण सातारकर,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

२०) श्री.श्रीरंग अंबादास गोरकर,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

२१) सुनिल दत्तात्रय हुबे (मयत) वारस,
श्री.नितीन सुनिल हुबे,
शेखर देशमुख यांच्या गिरणीसमोर, रामकृष्णनगर,
परभणी, ता.जि.परभणी

२२) श्री.सुहास तानाही दळवी,
रा.म्युन्सीपल कॉलनी, दर्गा रोड, परभणी

२३) श्री.योगेश बसंत राऊत,
रा.वसंत कृष्णा स्टोअर, स्टेशनरोड, पदमपूरा औरंगाबाद

२४) श्री.बाळकृष्ण नारायण जोशी,
रा.वकिल कॉलनी, स्टेशनरोड, परभणी

२५) श्री.विठ्ठल सांडूजी राऊत,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

२६) श्री.रख्माजी राजाराम वाघमारे,
रा.सिडको बसस्टॅण्ड जवळ, औरंगाबाद

२७) श्रीमती सुरेखा रख्माजी वाघमारे,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद

२८) श्री.राजेंद्र रघुनाथराव पाटील,
रा.डॉ.भगवान महाजन यांच्या दवाखान्याजवळ, समर्थनगर, औरंगाबाद

२९) श्री.करण राजेंद्र दर्डा,
रा.सातारा, ता.जि.औरंगाबाद -- प्रतिवादी

**दावा :** महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५७ अवये मौ.सातारा, ता.जि.औरंगाबाद येथील गट नं.५८ (जुना स.नं.३७) या शेतजमिनी संदर्भाने मा.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) औरंगाबाद यांनी एमएआरजीआय नं.०४/१९७७ मधील निशाणी क्र.७० मध्ये दि.३/५/२००८ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावी करण्याकरिता फेरफार नोंद क्र.३०६४, ३४२५, ३३५५, ३६१६, ३७९८, ५००२, ५३१९, ५६३८, ५८५४, ७२५८, ७४८९, ८१२०, ८४७१, ८८१३, ८८१४, ८८१५, १३०९१, १४३७०, १४२८९, १४३०२, १४३०३ व १४५५४ बाबत अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्यांच्याकडील प्रकरण क्र.२०११/अपील/एमएलआरसी/सीआर-२९, या मध्ये दि.१६/११/२०१६ रोजीच्या रोजनाम्यात पारीत केलेल्या आदेशाच्या नाराजीने दाखल केलेले अपील.

| | | | |
|---|---|---|---|
| पुनरिक्षण अर्जदार यांचे वकील | : | ॲड. | जे.एस.गव्हाणे |
| प्रतिवादी क्र.१ व २ यांचे वकील | : | ॲड. | एस.बी.सोळंके |
| प्रतिवादी क्र.५ यांचे वकील | : | ॲड. | जी.व्ही.सुकाळे |

## निर्णय

पुनरिक्षण अर्जदार यांनी सदरचा पुनरिक्षण अर्ज अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्यांच्याकडील प्रकरण क्र.२०११/अपील/एमएलआरसी/सीआर-२९, या मध्ये दि.१६/११/२०१६ रोजीच्या रोजनाम्यात पारीत केलेल्या आदेशाच्या नाराजीने दाखल केला आहे. प्रकरण दाखल झाल्या नंतर छाणनी करुन नोंदवून घेण्यात आले व

संबंधिताना नोटीसा काढण्यात आल्या. प्रकरणात प्रथम सुनावणी दि.०२/०१/२०१६ रोजी घेण्यात आली. त्यानंतर प्रकरणात वारंवार सुनावण्या घेण्यात आल्या. प्रतिवादी क्र.३,४ व ६ ते २०, २२ ते २९ यांना नोटीसा तामिल होऊनही ते सुनावणीस हजर राहिले नाही, त्यामुळे प्रकरण त्यांच्या विरुध्द एकतर्फा करुन दि.१२/१२/२०१७ रोजी अंतिम सुनावणीस अर्जदार व प्रतिवादी क्र.१, २ व ५ यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरण निर्णय देण्यासाठी राखुन ठेवण्यात आले.

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, मौ.सातारा, ता.जि.औरंगाबाद येथील गट नं.५८ (जुना स.नं.३७) या शेतजमिनी संदर्भाने मा.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) औरंगाबाद यांनी एमएआरजीआय नं.०४/१९७७ मधील निशाणी क्र.७० मध्ये दि.३/५/२००८ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावी करण्याकरिता फेरफार नोंद क्र.३०६४, ३४२५, ३३५५, ३६१६, ३७९८, ५००२, ५३१९, ५६३८, ५८५४, ७२५८, ७४८९, ८१२०, ८४७१, ८८१३, ८८१४, ८८१५, १३०११, १४३७०, १४२८९, १४३०२, १४३०३ व १४५५४ हे रद्द करण्याबाबत प्रतिवादी क्र.१ व २ यांनी तहसीलदार, औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण दाखल केले. फेरफार रद्द करण्याचे कार्यक्षेत्र तहसीलदार यांच्या अधिकारात येत नसल्याने त्यांनी सदर प्रस्ताव दि.२०/११/२००९ रोजी उप विभागीय अधिकारी औरंगाबाद यांच्याकडे दाखल केला. सदर प्रस्तावानुसार उप विभागीय अधिकारी यांनी सर्व हितसंबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी देऊन दि.१५/११/२०१० रोजी प्रतिवादी क्र.१ व २ यांचा अर्ज/प्रस्ताव नामंजूर करण्याचे आदेश पारीत केले. सदर आदेशाच्या नाराजीने प्रतिवादी क्र.१ व २ यांनी अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे दि.१४/१/२०११ रोजी अपील दाखल केले. सदर अपील सुनावणी प्रक्रियेमध्ये दि.३१/७/२०१२ रोजी खारीज (DID) करण्यात आले. सदर आदेशानुसार प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दि.३०/८/२०१२ रोजी प्रकरण पुर्नस्थापीत करण्याकरिता अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केला. त्यानुसार प्रकरण पुर्नस्थापीत करण्याच्या मुद्यावर सुनावणीस ठेवण्यात आली असता सदर पुर्नस्थापीत करण्याचा अर्ज दि.३/९/२०१३ रोजी खारीज (DID) करण्यात आला. त्या आदेशाच्या नाराजीने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी पुन्हा दि.११/७/२०१६ रोजी २ वर्षे १० महिने विलंबाने प्रकरण पुर्नस्थापीत करण्याचा अर्ज दाखल केला. त्याप्रकरणाच्या सुनावणी मध्ये दि.१६/११/२०१६ रोजीच्या रोजनाम्यात प्रकरण पुर्नस्थापीत करण्याचा अर्ज विलंब क्षमापनासह अपर जिल्हाधिकारी यांनी मंजूर करुन गुणवत्तेवर निर्णय घेण्याकरिता मुळ अपील सुनावणीस ठेवण्याचे आदेश पारीत केले. त्या आदेशाच्या नाराजीने प्रस्तुत पुनरिक्षण अर्ज या न्यायालयात दाखल करण्यात आला आहे.

अर्जदार हे त्यांच्या पुनरिक्षण अर्जात नमूद करतात की, उप विभागीय अधिकारी औरंगाबाद यांनी पारीत केलेल्या आदेशाच्या नाराजीने प्रतिवादी क्र.१ व २ यांनी अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले होते. त्याप्रकरणात ते व त्यांचे विधीज्ञ सतत गैरहजर राहात असल्याने अपर जिल्हाधिकारी यांनी दि.३१/३/२०१२ रोजी सदर प्रकरण खारीज (DID) करण्याचे आदेश पारीत केले. ते खारीज झालेले प्रकरण पुर्नस्थापीत करण्याकरिता प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दि.२७/८/२०१२ रोजी अर्ज करुन खारीज करण्याचे आदेश रद्द करण्याची विनंती केली. त्यानंतर प्रकरण पुर्नस्थापीत करण्याच्या मुद्यावर सुनावणीस ठेवण्यात आले होते. त्यामध्येही प्रतिवादी

क्र.१, २ व त्यांचे विधीज्ञ सतत गैरहजर राहात असल्याने अपर जिल्हाधिकारी यांनी पुन्हा सदर प्रकरण दि.३/९/२०१३ रोजी खारीज (DID) करण्याचे आदेश पारीत केले. त्या आदेशाच्या नाराजीने प्रतिवादी क्र.१ व २ यांनी २ वर्षे १० महिने विलंबाने प्रकरण पुर्नस्थापीत करण्याचा अर्ज दाखल केला. प्रकरण पुर्नस्थापीत करण्याच्या अर्जातील विलंबाच्या मुद्यावर दि.१४/९/२०१६, १९/१०/२०१६ व दि.१६/११/२०१६ रोजी सुनावणीस ठेवण्यात आले होते. दि.१६/११/२०१६ रोजीच्या सुनावणीमध्ये त्याप्रकरणातील प्रतिवादी गैरहजर असल्याने पुढील सुनावणी दि.२१/१२/२०१६ असे रोजनाम्यात लिहण्यात आले होते, परंतु त्यानंतर पुढील सुनावणीची तारीख खोडून त्या रोजीनाम्याच्या खाली "अर्जदाराचे वकीलांनी Ruling दाखल केले. युक्तीवाद ऐकला. Restoration अर्ज विलंब क्षमापनासह मंजूर, गुणवत्तेवर अंतिम सुनावणीसाठी ठेवा, पु.ता.३०/११/१६" असे नमूद केले. वास्तविक प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दाखल केलेल्या विलंब क्षमापनाच्या अर्जात झालेल्या विलंबा बाबतची कोणतीही दिवसागणीकची कारणे सबळ पुराव्यासह नमूद केली नाही, विलंब क्षमापनाचा कालावधी व या अगोदर दोन वेळेस प्रकरण खारीज (DID) करण्याचे दिलेले आदेश विचारात न घेता विलंब क्षमापनाच्या मुद्यावर कोणतेही सविस्तर आदेश पारीत न करता अपर जिल्हाधिकारी यांनी एकाच तारखेस दोन वेळेस सुनावणी घेऊन व दोन वेळेस रोजनामा लिहून प्रतिवादी क्र.१ व २ यांचा पुर्नस्थापनेचा अर्ज विलंब क्षमापनाच्या अर्जासह मंजूर करण्याचे आदेश पारीत केले, जे कायदेशीर नाही.

मौ.सातारा, ता.जि.औरंगाबाद येथील जुना स.नं.३७ नविन गट नं.५८ चे मुळ मालक श्रीमती सिताबाई रामचंद्र या होत्या. वादातील जमिनीवर श्री.पंडीत मार्तंडराव सातारकर हे १ एकर १९ गुंठे जमिनीवर संरक्षीत कुळ होते. त्यांनी कलम ३८ (४) अन्वये कुळाच्या मालकी हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता दि.२१/६/१९८५ रोजी अर्ज दाखल केला. त्यानुसार योग्य ती रक्कम भरुन घेऊन दि.१९/१२/१९८८ रोजी हैद्राबाद कुळवहिवाट आणि शेतजमिन अधिनियम, १९५० चे कलम ३८ (६) नुसार मालकी हक्काचे प्रमाणपत्र देण्यात आले. सदर आदेशाच्या नाराजीने सिताबाई यांचे भाचे श्री.प्रभाकर अच्युतराव मुधलवाडकर यांनी उप जिल्हाधिकारी (भुसूधार) यांच्याकडे अपील दाखल केले होते, ते अपील दि.१८/१२/१९९० रोजी फेटाळण्यात आले. त्या आदेशाच्या नाराजीने त्यांनी महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, औरंगाबाद यांच्याकडे रिव्हीजन अर्ज दाखल केला होता. तो अर्ज दि.१९/६/१९९२ रोजी फेटाळण्यात आला. सदर आदेशाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील केले नसल्याने सदर आदेश अंतिम राहिले. त्यानुसार श्री.पंडीतराव मार्तंडराव सातारकर यांनी कलम ५० (ब) नुसार दि.२४/११/१९९५ रोजी जमिन विक्रीची परवानगी उप जिल्हाधिकारी (भुसूधार) यांच्याकडे मागितली. त्यानुसार उप जिल्हाधिकारी (भुसूधार) यांनी अर्जदार यांना जमिन विक्री करण्याकरिता दि.३/२/१९९६ रोजी परवानगी दिली. सदर परवानगीनुसार अर्जदार यांनी खरेदी केलेल्या जमिनीच्या महसूली अभिलेखाला नोंद घेण्याकरिता फेरफार नोंद क्र.३७९४ ही दि.२१/१२/१९९९ रोजी मंजूर करण्यात आलेली आहे. त्यानंतर अर्जदार यांनी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडून अकृषिक परवानगी घेऊन त्यामध्ये भूखंड पाडून विविध व्यक्तिंना विक्री

केले आहे. मुळ मालक श्रीमती सिताबाई रामचंद्र यांनी दि.२८/१/१९६९ रोजी करुन दिलेले मृत्युपत्राचे प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयाने अंतिम केले आहे. मा.न्यायालयात प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दाखल केलेल्या कोणत्याही प्रकरणात गाव नमुना नं.७/१२ उताऱ्याच्या मालकी हक्कात नमूद असलेल्या व्यक्तिंना पक्षकार केले नाही. त्यामुळे सदर निकाल त्यांच्यावर बंधनकारक नाही. अर्जदार व इतर प्रतिवादी हे वेळोवेळी झालेल्या व्यवहारानुसार मालक व कब्जेदार झाले असल्याने त्यांच्या नावे मंजूर करण्यात आलेले फेरफार रद्द करता येणार नाही, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण औरंगाबाद यांचे आदेशा विरुध्द अपील केल्याचा पुरावा प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दाखल केला नाही, हा उप विभागीय अधिकारी औरंगाबाद यांनी काढलेला निष्कर्ष कायदेशीर आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी अपर जिल्हाधिकारी यांच्या समोर दाखल केलेले अपील चालविण्या योग्य नाही, ही बाब प्रकरण पुर्नस्थापीत करण्याचे आदेश पारीत करतांना विचारात घेतली नाही. तसेच प्रकरण दोन वेळेस खारीज करण्यात आलेले आहे, प्रकरण पुर्नस्थापीत करण्यास झालेला २ वर्षे १० महिन्याचा विलंब, त्याची कारणे संयुक्तिक आहे किंवा नाही या कायदेशीर बाबीचा विचार न करता व त्यावर सविस्तर आदेश पारीत न करता रोजनाम्यात प्रकरण पुर्नस्थापीत करुन विलंब क्षमापीत करण्याचे आदेश पारीत केले, जे बेकायदेशीर असल्याने सदर आदेश रद्द करण्यात यावे व अर्जदार यांचा पुनरिक्षण अर्ज मंजूर करण्यात यावा, असे प्रतिपादन केले.

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी आपल्या लेखी उत्तरात असे नमूद केले की, उप विभागीय अधिकारी औरंगाबाद यांनी पारीत केलेल्या आदेशाच्या नाराजीने प्रतिवादी क्र.१ व २ यांनी कायदेशीर तरतूदीखाली अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे अपील दाखल केले होते. ते अपील खारीज करण्यात आल्याने सदर प्रकरण पुर्नस्थापीत करण्याकरिता असलेल्या तरतूदीनुसार त्यांनी अर्ज दाखल केला होता, परंतु ते ही प्रकरण दि.३/९/२०१३ रोजी खारीज करण्यात आले. सदर आदेशाची माहिती वेळीच प्रतिवादी क्र.१ व २ यांना न मिळाल्याने त्याच्या नाराजीने पुर्नस्थापीत करण्याचा अर्ज मुदतीत देता आला नसल्याने प्रकरण पुर्नस्थापीत करण्याचा अर्ज करण्यास विलंब झाला व त्याबाबतचा विलंब क्षमापनाचा वेगळा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे दाखल केला होता. तसेच सदर विलंब क्षमापीत करण्याकरिता असलेली Ruling ची प्रति दाखल केली होती, त्याची अपर जिल्हाधिकारी यांनी शहानिशा करुन प्रतिवादी यांना प्रकरण पुर्नस्थापीत करण्यास झालेला विलंब क्षमापीत करुन प्रकरण पुर्नस्थापीत करण्यात येऊन मुळ अपीलावर सुनावणीस ठेवण्याचे आदेश पारीत केले, जे कायदेशीर आहे. खारीज झालेले प्रकरण पुर्नस्थापीत करावयाचे किंवा नाही, त्याबाबत असलेली कायदेशीर तरतूद, प्रकरणातील गुणवत्ता विचारात घेऊन प्रतिवादी यांचा पुर्नस्थापनेचा अर्ज मंजूर करण्याचे आदेश पारीत केलेले असल्याने सदर आदेश कायम ठेवण्यात यावे व अर्जदार यांचा पुनरिक्षण अर्ज नामंजूर करुन मुळ अपीलावर निर्णय देण्याकरिता प्रकरण अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावे, असे प्रतिपादन केले.

दोन्ही पक्षकारांच्या विद्यमान विधीज्ञांचा युक्तीवाद, अर्जदार यांनी दाखल केलेला पुनरिक्षण अर्ज, प्रकरणातील दाखल अभिलेख व खालील न्यायालयाची प्रकरणाशी संबंधीत मुळ संचिका यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मौ.सातारा, ता.जि.औरंगाबाद येथील गट नं.५८ (जुना स.नं.३७) या शेतजमिनी संदर्भाने मा.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) औरंगाबाद यांनी एमएआरजीआय नं.०४/१९७७ मधील निशाणी क्र.७० मध्ये दि.३/५/२००८ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावी करण्याकरिता फेरफार नोंद क्र.३०६४, ३४२५, ३३५५, ३६१६, ३७९८, ५००२, ५३१९, ५६३८, ५८५४, ७२५८, ७४८९, ८१२०, ८४७१, ८८१३, ८८१४, ८८१५, १३०९१, १४३७०, १४२८९, १४३०२, १४३०३ व १४५५४ हे रद्द करण्याबाबत प्रतिवादी क्र.१ व २ यांनी तहसीलदार, औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण दाखल केले. फेरफार रद्द करण्याचे कार्यक्षेत्र तहसीलदार यांच्या अधिकारात येत नसल्याने त्यांनी सदर प्रस्ताव दि.२०/११/२००९ रोजी उप विभागीय अधिकारी औरंगाबाद यांच्याकडे दाखल केला. सदर प्रस्तावानुसार उप विभागीय अधिकारी यांनी सर्व हितसंबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी देऊन दि.१५/११/२०१० रोजी प्रतिवादी क्र.१ व २ यांचा अर्ज/प्रस्ताव नामंजूर करण्याचे आदेश पारीत केले. सदर आदेशाच्या नाराजीने प्रतिवादी क्र.१ व २ यांनी अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे दि.१४/१/२०११ रोजी अपील दाखल केले. सदर अपील सुनावणी प्रक्रियेमध्ये दि.३१/७/२०१२ रोजी खारीज (DID) करण्यात आले. सदर आदेशानुसार प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दि.३०/८/२०१२ रोजी प्रकरण पुर्नस्थापीत करण्याकरिता अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केला. त्यानुसार प्रकरण पुर्नस्थापीत करण्याच्या मुद्यावर सुनावणीस ठेवण्यात आली असता सदर पुर्नस्थापीत करण्याचा अर्ज दि.३/९/२०१३ रोजी खारीज (DID) करण्यात आला. त्या आदेशाच्या नाराजीने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी पुन्हा दि.११/७/२०१६ रोजी २ वर्षे १० महिने विलंबाने प्रकरण पुर्नस्थापीत करण्याचा अर्ज दाखल केला. त्याप्रकरणाच्या सुनावणी मध्ये दि.१६/११/२०१६ रोजीच्या रोजनाम्यात प्रकरण पुर्नस्थापीत करण्याचा अर्ज विलंब क्षमापनासह अपर जिल्हाधिकारी यांनी मंजूर करुन गुणवत्तेवर निर्णय घेण्याकरिता मुळ अपील सुनावणीस ठेवण्याचे आदेश पारीत केले. त्या आदेशाच्या नाराजीने प्रस्तुत पुनरिक्षण अर्ज या न्यायालयात दाखल करण्यात आला आहे.

अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाच्या प्रकरणाशी संबंधीत संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांच्याकडे दि.१४/१/२०११ रोजी उप विभागीय अधिकारी औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशाच्या नाराजीने अपील अपील दाखल केले. सदर अपील सुनावणी प्रक्रियेमध्ये दि.३१/७/२०१२ रोजी खारीज (DID) करण्यात आले. सदर आदेशानुसार प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दि.३०/८/२०१२ रोजी प्रकरण पुर्नस्थापीत करण्याकरिता अर्ज दाखल केला. त्याअर्जानुसार प्रकरण पुर्नस्थापीत करण्याच्या मुद्यावर सुनावणीस ठेवण्यात आले असता सदर पुर्नस्थापीत करण्याचा अर्ज दि.३/९/२०१३ रोजी खारीज (DID) करण्यात आला. त्या आदेशाच्या नाराजीने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी पुन्हा दि.११/७/२०१६ रोजी २ वर्षे १० महिने विलंबाने प्रकरण पुर्नस्थापीत करण्याचा अर्ज दाखल केला. त्याप्रकरणाच्या सुनावणी मध्ये दि.१६/११/२०१६ रोजीच्या रोजनाम्यात प्रकरण पुर्नस्थापीत करण्याचा अर्ज विलंब क्षमापनासह अपर जिल्हाधिकारी यांनी मंजूर करुन गुणवत्तेवर निर्णय घेण्याकरिता मुळ अपील सुनावणीस ठेवण्याचे आदेश पारीत केल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दाखल केलेले प्रकरण दोन वेळेस खारीज करण्यात आले असून प्रकरण पुर्नस्थापीत करण्याचा अर्ज करण्यास झालेला २ वर्षे १० दिवसाच्या विलंबा बाबत

दिवसागणीकची कारणे सबळ पुराव्यासह विलंब क्षमापनाच्या अर्जात प्रतिवादी क्र.१ व २ यांनी नमूद केल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रकरण दुसऱ्यांदा खारीज झाल्याने ते पुर्नस्थापीत करतांना प्रथम विलंबावर सविस्तर आदेश पारीत करणे व त्यानंतर प्रकरणातील गुणवत्ता विचारात घेऊन प्रकरण पुर्नस्थापीत करणे योग्य आहे किंवा नाही, याचा विचार करणे आवश्यक असते. परंतु दि.१६/११/२०१६ रोजी रोजनाम्यात आदेश पारीत करतांना वरील बाबी विचारात घेतल्याचे दिसून येत नाही. प्रकरणातील मुळ मुद्दा की, मा.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) औरंगाबाद यांचे एम.ए.आर.जी.आय. नं.०४/१९७७ मधील निशाणी क्र.७० वर दि.३/५/२००८ रोजी पारीत केलेल्या निकालाची अंमलबजावणी करणे हा, आहे. त्याबाबत उप विभागीय अधिकारी यांनी योग्य ती चौकशी करुन सविस्तर विवेचनानुसार निष्कर्ष काढून आदेश पारीत केलेले आहे, ही बाब अपर जिल्हाधिकारी यांनी दि.१६/११/२०१६ रोजी रोजनाम्यात आदेश पारीत करतांना विचारात घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर आदेश रद्द करण्याच्या पात्रतेचे आहे, या निष्कर्षाप्रत मी आलो असल्याने खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) पुनरिक्षण अर्जदार यांचा पुनरिक्षण अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी त्यांच्याकडील क्र.२०११/अपील/एमएलआरसी/सीआर-२९, या मध्ये दि.१६/११/२०१६ रोजीच्या रोजनाम्यात पारीत केलेले आदेश रद्द करण्यात येतात.

३) संबंधितांना कळवून प्रकरण बंद करुन अभिलेख कक्षात वर्ग करा.

( शिवानंद टाकसाळे )
अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
16/1/18

**प्रमाणित प्रत**

अर्ज केल्याचा दि. 17-1-18 श्री. [illegible]
नक्कल तयार झाल्याचा दि. 17-1-18
नक्कल दिल्याचा दि. 17-1-18 यांनी श्री. [illegible]
पानांची संख्या 07 पाने यांचेमार्फत सादर केलेल्या अर्जावरुन
एकुण फी रु. 07x15=105/-
अभिलेखपाल 17-1-18
विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद